## मुंबई

# डायरी

**विकास महाविद्यालय :** 'विज्ञान, शाश्वतता आणि सद्य परिस्थितीतील सामाजिक आव्हाने व संधी' विषयावर आंतरराष्ट्रीय परिषद. सहभाग- डॉ. गोपाल कृष्ण, ॲड. शरद चिटणीस, डॉ. केतकी बापट आदी. विकास महाविद्यालय सभागृह, कन्नमवारनगर-२, विक्रोळी पूर्व. स. ९पासून.

**एलआयसी, गेटवे लिटफेस्ट :** ज्ञानपीठ पुरस्कारविजेते भालचंद्र नेमाडे, केदारनाथ सिंग, प्रतिभा राय व सिताकांत महापात्रा तसेच अदूर गोपालकृष्णन, एन.एस. माधवन आदींचा सहभाग असलेला दोन दिवसीय साहित्य महोत्सव. एनसीपीए. स. ११पासून.

**भारतीय विद्या भवन :** 'व्यवसाय व मानवी मूल्ये' विषयावर उदय कोप्पीकर यांचे व्याख्यान. गीता मंदिर सभागृह, भारतीय विद्याभवन, कुलपती मुन्शी मार्ग, गिरगाव चौपाटी. दु. ३ वा.

**लोकमान्य सेवा संघ :** संघाच्या 'दिलासा' केंद्रातर्फे 'मृत्यूपश्चात जीवनदान' विषयावर अवयवदान जाणीवजागृती कार्यक्रम. गोखले सभागृह, पहिला मजला, टिळक मंदिर, राम मंदिर मार्ग, विलेपार्ले पूर्व. दु. ३.३० वा.

**व्ही.जी. वझे कॉलेज :** ३२वा वार्षिक पारितोषिक वितरण सोहळा. प्रमुख अतिथी- पद्मविभूषण डॉ. अनिल काकोडकर, राधाबाई वझे सभागृह, वझे कॉलेज, मिठागर रोड, मुलुंड पूर्व. सायं. ४ वा.

**नानावटी सुपरस्पेशॅलिटी हॉस्पिटल :** स्तनांचा कर्करोगाविषयी जनजागृतीसाठी तज्ज्ञ डॉक्टरांचा मार्गदर्शनपर कार्यक्रम. हॉस्पिटलचे सभागृह, विलेपार्ले पश्चिम. सायं. ४ वा.

**परचुरे प्रकाशन मंदिर :** नीला सत्यनारायण यांच्या 'जाळरेषा' पुस्तकाचे प्रकाशन. हस्ते- राज्यपाल सी. विद्यासागर राव. प्रमुख वक्ते- अभिनेते नाना पाटेकर, रंगस्वर सभागृह, यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, मंत्रालयासमोर. सायं. ४.३० वा.

डायरी सदरात कार्यक्रम पाठवण्यासाठी